# अभंग - ज्ञानेश्वरी

## अध्याय दहावा

शुद्ध-ज्ञान-दानीं । होसी तूं चतुर । तुज नमस्कार । गुरुराया ॥१॥
गुरुराया तूं चि । [१]करिसी [१]प्रफुल्ल । सुरम्य कमळ । विद्यारूप ॥२॥
* परेचा विषय । [२]स्वस्वरूप-स्थिति । तेथें तुज [३] रति । सर्वकाळ ॥३॥
संसार-तमासी । होसी तूं भास्कर । तुज नमस्कार । गुरुराया ॥४॥
बळ तुझें थोर । अनंत अपार । नाहीं पारावार । तयालागीं ॥५॥
अवस्था * तुरीय । तारुण्य-संपन्न । तियेचें लालन । करिसी तूं ॥६॥
सकळ विश्वासी । पाळिसी साचार । तुज नमस्कार । गुरुराया ॥७॥
मांगल्य-रत्नांची । तूं चि एक ठेव । तूं चि एक देव । पूजनीय ॥८॥
साधुसंतजन । हें चि कोणी वन । तूं एक चंदन । तयांतील ॥९॥
स्वानुभूतीचा तूं । राजराजेश्वर । तुज नमस्कार । गुरुराया ॥१०॥
सुज्ञजनचित्त-। रूपी जो चकोर । तयासी साचार । चंद्रमा तूं ॥११॥
वेदरहस्याचा । सागर तूं साचा । तेविं मदनाचा । मदन तूं ॥१२॥
तूं चि शुद्ध-भावें । भजावया स्थान । श्रीगुरो, वंदन । करीं तुज ॥१३॥
प्रपंचस्वरूपी । मत्त कुंजराचें । भेदिसी तूं साचें । गंडस्थळ ॥१४॥
नमो गुरुराया । एक तूं केवळ । उत्पत्तीचें स्थळ । विश्वाचिया ॥१५॥
तुझ्या कृपारूपी । गणेशाचें बळ । लाभतां सकळ । विद्यांमाजीं ॥१६॥
होतसे प्रवेश । अज्ञ बाळाचा हि । तिळमात्र नाहीं । शंका येथें ॥१७॥
सद्गुरो, आपुलें । उदार वचन । देई वर-दान । अभयाचें ॥१८॥
तरी * नव-रस-। सुधाब्धीचा ठाव । मग सुखेनैव । घेऊं येई ॥१९॥
आपुल्या स्नेहाची । देवी वागेश्वरी । जरी अंगिकारी । मुक्यातें हि ॥२०॥
तरी तो [४]प्रबंधीं । बृहस्पतीशीं हि । करूं शके पाहीं । पैजहोड ॥२१॥

---

* परिशिष्ट पहा.   १ फुलवितोस.   २ आत्मरूपांत राहणें.   ३ क्रीडा; खेळणें.   ४ ग्रंथरचनेंत.

जयाचिया माथां । पडे पद्म-हस्त । कृपादृष्टि होत । जयावरी ॥२२॥
असोनि तो जीव । तयालागीं साची । शिव-स्वरूपाची । योग्यता ये ॥२३॥
ऐशा सर्व गोष्टी । सामर्थ्यें ज्या होती । तें मी वानूं किती । वाचा-बळें ॥२४॥
काय सांगा रंग । लावोनियां चांग । उजळावें अंग । आदित्याचें ॥२५॥
अहो कल्प-वृक्ष । असे जो सहज । तया पुष्प-साज । कासयासी ? ॥२६॥
कापुरा सुगंध । कासयानें द्यावा । [१]केविं क्षीरार्णवा । [२]पाहुणेर ॥२७॥
काय अमृतातें । वाढावें पक्वान्न । चंदना लेपन । कासयाचें ? ॥२८॥
नभासी मंडप । घालवेना जैसा । श्रीगुरु तो तैसा । वर्णवेना ! ॥२९॥
श्रीगुरु-सामर्थ्य । कळावें संपूर्ण । ऐसें तों साधन । असे कोठें ? ॥३०॥
म्हणोनि निवांत । राहोनियां भलें । नमन मीं केलें । श्रीगुरूसी ॥३१॥
बुद्धीचिया बळें । गुरु-महिमान । यथार्थ वर्णन । करूं जावें ॥३२॥
तरी मोतियासी । अभ्रकाचें पुट । तैसी च ती गत । होय तेथें ॥३३॥
मढवावें जैसें । [३]रजतें सुवर्ण । तैसें हें स्तवन । श्रीगुरूचें ॥३४॥
म्हणोनियां आतां । स्वीकारोनि मौन । धरावे चरण । हें चि भलें ॥३५॥
ज्ञानदेव म्हणे । ममत्वें जी तुम्हीं । कृपा केली स्वामी । मजवरी ॥३६॥
तेणें कृष्णार्जुन–। संगमीं प्रत्यक्ष । झालों वट-वृक्ष । [४]प्रयागींचा ॥३७॥
मागां *उपमन्यू । जो का बाळभक्त । दुधासाठीं हट्ट । घेई जेव्हां ॥३८॥
तेव्हां नीळकंठ । क्षीराब्धीची वाटी । तयाचिया ओठीं । लावी जैसा ॥३९॥
किंवा ध्रुवबाळ । रुसोनियां गेला । कौतुकें तयाला । श्रीविष्णूंनीं ॥४०॥
ध्रुवपदरूपी । [५]भातुकलें भलें । देवोनियां केलें । आनंदित ॥४१॥
तैसें भगवद्गीता–। नामें सर्वश्रेष्ठ । [६]पावन जो ग्रंथ । अध्यात्माचा ॥४२॥
सकळ शास्त्रांचें । विश्रांतीचें स्थान । तयाचें व्याख्यान । करावया ॥४३॥
दिलें बळ तुम्हीं । मज गुरुराया । [७]प्राकृतीं गावया । ओंवीछंदें ॥४४॥
शब्दाचिया रानीं । वाचा-वृक्ष भला । विवेकें फळला । आढळेना ॥४५॥
परी तुम्ही माझी । वाणी च ती आतां । केली कल्प-लता । विवेकाची ॥४६॥

---

१ कसा? २ पाहुणचार. ३ रुप्यानें. ४ प्रयाग क्षेत्रांतील. ५ खाऊ. ६ पवित्र. ७ मराठींत.

तादात्म्यता झाली । होती देहाशीं च । आतां बुद्धि साच । आत्मरूप ।।४७।।
मग ब्रह्मानंद-। भांडारासी जागा । कां न व्हावी सांगा । सर्वथा ती ।।४८।।
आणि गीतार्थाच्या । क्षीरसागरांत । झोंपलें निवांत । मन माझें ।।४९।।
आपुलें हें ऐसें । सामर्थ्य अपार । सद्गुरो, साचार । वर्णूं कैसें ।।५०।।
परी धिटाईनें । गेलों जें बोलून । कृपेनें सहन । करावें तें ।।५१।।
गीतेचा पूर्वार्ध । आपुल्या प्रसादें । वर्णिला विनोदें । ओंवीबद्ध ।।५२।।
पहिल्या अध्यायीं । अर्जुनाचा खेद । योग तो [१] विशद । [२] दुज्यामाजीं ।।५३।।
परी ज्ञान-योग । आणि बुद्धि-योग । दाखविला चांग । विभागोनि ।।५४।।
तृतीय अध्यायीं । केवळ कर्माचें । थोरपण साचें । वाखाणिलें ।।५५।।
चतुर्थ अध्यायीं । तें चि कर्म भलें । [३] साङ्ग प्रकटिलें । ज्ञानासह ।।५६।।
पांचव्या अध्याया-। माझारीं उचित । केलें जें सूचित । योगतत्त्व ।।५७।।
तें चि सहाव्यांत । सांगितलें स्पष्ट । अष्टांगांसहित । विवरोनि ।।५८।।
जेणें जीव-शिव । होती एकवट । योग-स्थिति नीट । दाविली ती ।।५९।।
आणि योगभ्रष्टां । मिळे कोण गति । सर्व उपपत्ति । सांगितली ।।६०।।
सप्तमाध्यायांत । प्रकृतीची मात । प्रारंभीं [३] साद्यंत । विवरिली ।।६१।।
उदार भक्तांचे । चार हि प्रकार । वर्णिले साचार । मग पुढें ।।६२।।
अष्टमांत सप्त-। प्रश्नांचीं उत्तरें । आरंभीं विस्तारें । निवेदिलीं ।।६३।।
पुढें योग्यायोग्य । [४] प्रयाण-समय । वर्णोनि अध्याय । संपविला ।।६४।।
आतां असंख्यात । वेदांतील देखा । अंतर्गत जो का । अभिप्राय ।।६५।।
तो चि सामावला । महाभारतांत । एक लक्ष ग्रंथ । असे ज्याचा ।।६६।।
आणि सर्व महा-। भारतांत भला । असे सांठवला । [५] आशय जो ।।६७।।
तोचि कृष्णार्जुन-। संवादीं गीतेंत । देखा [६] ओतप्रोत । भरलासे ।।६८।।
गीता-सप्त-शत-। श्लोकीं जो आशय । तो चि एक होय । नवव्यांत ।।६९।।
म्हणोनि त्यांतील । अभिप्राय नीट । सर्वथा प्रकट । करावया ।।७०।।
कृपेविण मज । नाहीं झालें धैर्य । मी तों वायां काय । गर्व करूं ।।७१।।

---

१ स्पष्ट. २ दुसऱ्या अध्यायांत. ३ संपूर्ण. ४ मरणकाळ. ४ अभिप्राय; अर्थ. ६ संपूर्ण.

अहो [१]ढेपी * राब–। गुळा-साखरेच्या । एका चि रसाच्या । होती जरी ।।७२।।
तरी प्रत्येकाची । भिन्न स्वाद रुचि । तैसी च ती स्थिति । अध्यायांची ।।७३।।
कोणी ब्रह्मरूप । जाणोनि आपण । करिती वर्णन । मग त्याचें ।।७४।।
कोणी स्वयें [२]ब्रह्म–। तादात्म्य पावून । देती दाखवून । ब्रह्म-रूप ।।७५।।
कोणी जाणूं जातां । ज्ञेयीं होती लीन । ज्ञाता-ज्ञान-भान । विसरोनि ।।७६।।
ऐसे हे अध्याय । एकैक उत्तम । परी तो नवम । शब्दातीत ।।७७।।
तयाचा हि येथें । केला अनुवाद । प्रभो हा प्रसाद । आपुला चि ।।७८।।
सूर्याचिया परी । प्रकाशली साची । छाटी *वसिष्ठाची । जैशा रीती ।।७९।।
किंवा शापभ्रष्ट । *त्रिशंकूच्यासाठीं । केली प्रतिसृष्टि । विश्वामित्रें ।।८०।।
* नळें राम-नामें । पाषाण तारून । सागरावरून । सैन्य नेलें ।।८१।।
जन्मतां चि जैसें । करोनि उड्डाण । झोंबे *हनुमान । सूर्यबिंबा ।।८२।।
एका आचमनें । नातरी साचार । प्राशिला सागर । *अगस्तीनें ।।८३।।
तैसें तुम्हीं मज । मुक्याचिया मुखें । बोलविलें सुखें । बोलातीत ।।८४।।
राम-रावणाचें । युद्ध निरुपम । तैसा चि नवम । अध्याय तो ।।८५।।
तयाचिया तोला । तो चि एक साच । वर्णन ऐसें च । साजे तेथें ।।८६।।
जया तत्त्वज्ञातें । [३] आकळे गीतार्थ । निर्णय हा सार्थ । वाटे तया ।।८७।।
नऊ हि अध्याय । ऐसे हे पहिले । यथामति भले । वर्णिले मीं ।।८८।।
ऐका श्रोतेजन । आतां उत्तरार्ध । करीन विशद । ग्रंथाचा ह्या ।।८९।।
अध्यायीं [४]प्रस्तुत । देव भगवंत । *विभूति समस्त । सांगती ज्या ।।९०।।
तयांचें सुंदर । आणि रसपूर्ण । करीन वर्णन । मराठींत ।।९१।।
[५]देश-भाषेचिया । सौंदर्यें येथील । *शृंगारा जिंकील । *शांतरस ।।९२।।
आणि ओंव्या तरी । तो चि अलंकार । होईल साचार । *साहित्यासी ।।९३।।
पाहतां संस्कृत । मूळ गीताग्रंथ । आणि प्राकृतांत । टीका त्याची ।।९४।।
मग दोहोंतील । अभिप्राय भला । जरी आकळला । यथार्थत्वें ।।९५।।
तरी वाचकातें । नये ओळखितां । कोणता तत्त्वतां । मूळ ग्रंथ ।।९६।।

---

*परिशिष्ट पहा. १ गुळाचे खडे; रवे. २ ब्रह्माशीं एकरूप होऊन. ३ समजतो. ४ चालू. ५ मराठी भाषेच्या.

जेथें [1] स्वसौंदर्यें । सुंदर शरीर । होय अलंकार । अलंकारा ।।९७।।
तेथें अलंकृत । केलें कोणी कोणा । जैसा करवेना । निवाडा हा ।।९८।।
संस्कृत आणिक । प्राकृत ह्या भाषा । स्व-सौंदर्यें तैशा । विराजती ।।९९।।
एका भावार्थाच्या । सुखासनीं चांग । ऐका अंतरंग । चोखाळोनि ।।१००।।
कैसा होऊं लागे । रसांचा वर्षाव । उठावला भाव । प्रकटितां ।।१०१।।
आणि चतुरता । म्हणे हो सर्वथा । लाभली प्रतिष्ठा । आम्हालागीं ।।१०२।।
तैसें मराठीचें । लुटोनि लावण्य । आणिलें तारुण्य । रसांलागीं ।।१०३।।
मग अगणित । ऐसें गीता-सार । गुंफिलें सुंदर । शब्दांमाजीं ।।१०४।।
चतुर-चित्तासी । चमत्कारभूत । जगद्गुरु श्रेष्ठ । यादवेंद्र ।।१०५।।
हरि पार्थासंगें । ऐसें बोलूं लागे । ज्ञानदेव सांगे । निवृत्तीचा ।।१०६।।

श्रीभगवानुवाच–
भूय एव महाबाहो शृणु मे परमं वचः ।
यत्तेऽहं प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया ।।१।।

म्हणे [2] सर्वां [2] परी । होसी तूं तत्पर । श्रवणीं साचार । धनंजया ।।१०७।।
आम्हीं मागील जें । केलें निरूपण । तुझें अवधान । पाहिलें तें ।।१०८।।
तंव नव्हे अल्प । पुरें आहे भलें । प्रत्ययासी आलें । आमुचिया ।।१०९।।
घालोनि पहावें । घटीं जळ थोडें । धड तरी पुढें । भरावा तो ।।११०।।
तैसें तुझें लक्ष । पाहोनियां चांग । ऐकवावें साङ्ग । ऐसें वाटे ।।१११।।
ठेवणें घडेल । नूतन सेवक । तरी आधीं देख । तयावरी ।।११२।।
सर्व हि [3] पातोन । कसीं चोख तरी । करावा [4] भांडारी । तो चि जैसा ।।११३।।
तैसा पार्था, आतां । भक्त सर्वोत्तम । माझें निज-धाम । झालासी तूं ।।११४।।
अर्जुनाची ऐसी । योग्यता पाहोन । बोले नारायण । प्रेमभरें ।।११५।।
पाहोनि पर्वत । वृष्टि करी मेघ । तैसा तो श्रीरंग ।। कृपा-सिंधु ।।११६।।
म्हणे अभिप्राय । ऐक [5] सव्यसाची ।। सांगितला तो चि । पुन्हां सांगूं ।।११७।।
पेरावेंसें वाटे । वर्षोवर्षीं शेत । पीक वृद्धिंगत । होय जरी ।।११८।।

---

१ स्वतःच्या सुंदरपणानें. २ सर्व प्रकारें. ३ विश्वासानें सोंपवून. ४ खजिनदार. ५ हे अर्जुना !

आणि परिश्रम । करावया चांग । येई ना [१] उबग । मग तेथें ।।११९।।
वारंवार पुटें । देतां सुवर्णास । तयाचा तो कस । वाढे जरी ।।१२०।।
तरी मग तें चि । शुद्ध करायास । मनासी उल्हास । वाटतसे ।।१२१।।
म्हणोनियां तुज । वाटूं नये भार । नाहीं उपकार । येथें कांहीं ।।१२२।।
जाण आतां आम्ही । आपुलिया स्वार्था । तुजपाशीं पार्था । बोलतसों ।।१२३।।
अगा, बाळालागीं । लेववावें लेणें । बाळ तें का जाणे । शृंगारातें ।।१२४।।
परी तो सर्वथा । सुखाचा सोहळा । मातेसी च झाला । जैशा रीती ।।१२५।।
तैसें तुझें हित । तुज होय प्राप्त । तों तों [२] दुणावत । सुख माझें ।।१२६।।
उपमा दृष्टांत । आतां कासयासी । मज आवडसी । हें चि खरें ।।१२७।।
म्हणोनि बोलतां । तृप्ति न हो साच । वाटे बोलिलें च । बोलावेंसें ।।१२८।।
असो ह्या चि साठीं । तें चि तें सांगेन । देईं अवधान । धनंजया ।।१२९।।
तरी ऐकें आतां । मर्मज्ञ तूं साच । वाक्य हि तैसें च । श्रेष्ठ माझें ।।१३०।।
आलें परब्रह्म । अक्षरें लेवून । तुज आलिंगन । द्यावयासी ।।१३१।।
परी यथार्थत्वें । नेणसी तूं मातें । उभा मी जो येथें । विश्व चि तें ।।१३२।।

न मे विदुः सुरगणाः प्रभवं न महर्षयः ।
अहमादिर्हि देवानां महर्षीणां च सर्वशः ।।२।।

येथ वेद ते हि । [३] मौनावले पाहीं । मन-पवन हीं । पांगुळलीं ।।१३३।।
मावळले रवि–। शशी रात्रीविण । तयांसी दर्शन । नाहीं माझें ।।१३४।।
अगा उदरींचा । गर्भ जाणे काय । जननीचें वय । आपुलिया ? ।।१३५।।
पार्था, तैसें माझ्या । स्वरूपाचें ज्ञान । देवांसी हि जाण । होत नाहीं ।।१३६।।
नेणे जळचर । समुद्राचें [४] मान । [५] मशका गगन । [६] नोलांडवे ।।१३७।।
तेंविं महर्षींचें । ज्ञान धनंजया । मज देखावया । असमर्थ ।।१३८।।
केवढा मी कोण । कवणापासोन । जाहलों उत्पन्न । केव्हां कोठें ।।१३९।।
एक एक कल्प । निघोनियां जाय । न होई निर्णय । परी ह्याचा ।।१४०।।
ऋषि थोर थोर । तैसे चि ते देव । आणिक हें सर्व । भूतजात ।।१४१।।

---

१ कंटाळा. २ दुप्पट होतें. ३ गप्प बसले. ४ माप. ५ डांसाला. ६ ओलांडवत नाहीं.

तयां सर्वांचें हि । मूळ मी म्हणोन । सर्वथा कठिण । जाणावया ॥१४२॥
पर्वतावरोन । उतरलें पाणी । जाईल चढोनि । जरी पुन्हां ॥१४३॥
ना तरी वाढतां । झाड उंच उंच । जरी मूळाला च । पोंचेल तें ॥१४४॥
तरी जग झालें । जें माझ्यापासोन । तया जगा ज्ञान । होय माझें ! ॥१४५॥
ना तरी अर्जुना । अंकुरामाझारीं । सामावेल जरी । वटवृक्ष ॥१४६॥
तरंगीं सागर । जरी सांठवेल । राहील भूगोल । अणूमाजीं ॥१४७॥
तरी ऋषि देव । जीव [1] मदुद्भूत । जाणाया समर्थ । होती मातें ! ॥१४८॥
ऐसा मी अगम्य । तरी जरी कोणी । सर्व हि सांडोनि । [2] बाह्य वृत्ति ॥१४९॥
सर्वेंद्रियांलागीं । होय पाठमोरा । वळोनि माघारा । झडकरी ॥१५०॥
महाभूतांचिया । चढे माथ्यावरी । देहभाग दूरी । ठेवोनियां ॥१५१॥

यो मामजमनादिं च वेत्ति लोकमहेश्वरम् ।
असंमूढः स मर्त्येषु सर्वपापैः प्रमुच्यते ॥३॥

राहोनियां स्थिर । मग तिये स्थानीं । उन्मन-नयनीं । आपुलिया ॥१५२॥
अर्जुना निर्मळ । आत्म-प्रकाशांत । अजत्व निभ्रांत । देखे माझें ॥१५३॥
सकळ लोकांचा । मीच महेश्वर । असें पैलतीर । आदीचें हि ॥१५४॥
ऐशा मज येथें । ह्यापरी साचार । तत्त्वतां जो नर । जाणतसे ॥१५५॥
जणूं तो परीस । जाण पाषाणांत । जैसें कीं अमृत । रसांमाजीं ॥१५६॥
तैसा मनुष्यांत । माझा चि तो अंश । संशय ना लेश–। मात्र येथें ॥१५७॥
चालतीबोलती । ज्ञानाची तो मूर्ति । [3] तदंगें तीं होती । सौख्यांकुर ॥१५८॥
भासे मनुष्यत्व । तयाचिया ठायीं । भ्रांतिस्तव पाहीं । लोकालागीं ॥१५९॥
अगा सांपडला । हिरा कापुरांत । वरी अवचित । पडे नीर ॥१६०॥
तरी सांग तेथें । तो का विरघळे । अस्तित्व वेगळें । राहे त्याचें ॥१६१॥
तैसा माया-संग । न बाधे तयातें । जरी दिसे तेथें । देह-धारी ॥१६२॥
पाहें धनंजया । सर्व दोष तया । जाती सोडोनियां । स्वभावें चि ॥१६३॥
सोडोनियां जाती । ज्यापरी भुजंग । लागतां चि आग । चंदनासी ॥१६४॥

---

१ माझ्यापासून उत्पन्न झालेले. २ मनाची इंद्रियांकडील ओढ. ३ त्याचे अवयव.

तैसें जयालागीं । झालें माझें ज्ञान । संकल्प सोडोन । जाती तया ॥१६५॥
असो, आतां कैसें । व्हावें माझें ज्ञान । ऐसें तुझें मन । जरी कल्पी ॥१६६॥
कैसें माझें रूप । कैसे माझे भाव । सांगेन तें सर्व । ऐक आतां ॥१६७॥
भिन्न भिन्न भूतीं । प्रकृतिसारखे । होवोनियां देखें । भिन्न भिन्न ॥१६८॥
[1] विखुरले जे का । सर्व त्रैलोक्यांत । भाव ते यथार्थ । निरूपीन ॥१६९॥

बुद्धिर्ज्ञानमसंमोहः क्षमा सत्यं दमः शमः ।
सुखं दुःख भवोऽभावो भयं चाभयमेव च ॥४॥

अहिंसा समता तुष्टिस्तपो दानं यशोऽयशः ।
भवन्ति भावा भूतानां मत्त एव पृथग्विधाः ॥५॥

जाण पार्था बुद्धि । भाव हा प्रथम । ज्ञान जें निःसीम । तो चि दुजा ॥१७०॥
सहनसिद्धि किंवा । क्षमा, [2] असंमोह । भाव निःसंदेह । माझे चि हे ॥१७१॥
तेविं सत्य आणि । *शम * दम दोन्ही । असे जें का जनीं । सुख दुःख ॥१७२॥
आणि होय जें का । अस्तित्व नास्तित्व । सर्व हि ते भाव । जाण माझे ॥१७३॥
भय निर्भयता । अहिंसा समता । तेविं पंडु-सुता । तपोदान ॥१७४॥
आणिक संतोष । यश अपकीर्ति । भाव हे दिसती । सर्वत्र जे ॥१७५॥
भूतांचिया ठायीं । माझ्या चि पासोन । होती ते निर्माण । धनंजया ॥१७६॥
जैसीं होती भूतें । भिन्न भिन्न पाहीं । तैसे भाव ते हि । वेगळाले ॥१७७॥
उपजती कोणी । माझ्या जाणिवेंत । कोणी नेणिवेंत । जन्म घेती ॥१७८॥
प्रकाश आणिक । अंधार हीं दोन्ही । सूर्या चि पासोनि । होती जैसीं ॥१७९॥
होतां सूर्योदय । प्रकाश तो देख । आणिक काळोख । अस्तमानीं ॥१८०॥
माझें ज्ञानाज्ञान । हें तों भावाधीन । म्हणोनियां भिन्न । भाव [3] भूतीं ॥१८१॥
भरोनि राहिले । ऐसे माझे भाव । पार्था, सर्व जीव–। सृष्टीमाजीं ॥१८२॥
आतां सर्व लोक । करिती वर्तन । जयांच्या [4] आधीन । राहोनियां ॥१८३॥
भाव ते अकरा । सांगेन आणिक । सृष्टीचे पालक । असती जे ॥१८४॥

महर्षयः सप्त पूर्वे चत्वारो मनवस्तथा ।

---

१ पसरले. २ कशाचा हि मोह (भ्रम) न पडणें. ३ प्राणिमात्राचे ठिकाणीं. ४ ताब्यांत.

मद्भावा मानसा जाता येषां लोक इमा: प्रजा: ॥६॥

सर्व गुणीं श्रेष्ठ । ज्ञाते महर्षींत । सप्तर्षि विख्यात । *कश्यपादि ॥१८५॥
चौदा मनूंतील । मूळ मुख्य देख । *स्वायंभुवादिक । चार मनु ॥१८६॥
सृष्टीचा व्यापार । चालावा म्हणोनि । झाले माझ्या मनीं । अकरा हे ॥१८७॥
पाहें स्वर्गादिक । लोकांची व्यवस्था । नव्हती च पार्था । जिये वेळीं ॥१८८॥
आणि त्रैलोक्याचा । [१] मांड हा जो भला । नव्हता मांडला । तो हि कांहीं ॥१८९॥
जेव्हां पंचमहा-। भूतांचा समुदाय । नव्हता च [२] कार्य-। प्रवण तो ॥१९०॥
तेव्हां कश्यपादि । सप्त मुनि भले । आणि मनु झाले । चार हि ते ॥१९१॥
तयांनीं च मग । *अष्ट लोकपाल । निर्मिले सकल । इंद्रादिक ॥१९२॥
आठ हि दिशांचे । तयां स्वामी केलें । तयांनीं निर्मिले । मग लोक ॥१९३॥
म्हणोनि अकरा । राजे हे साचार । सर्व ते इतर । प्रजा ह्यांची ॥१९४॥
ऐशापरी विश्व-। विस्तार सकळ । माझा चि केवळ । ओळख तूं ॥१९५॥
पाहें आरंभीं तों । बीज तें एकलें । [३] विरूढतां झालें । तें चि बुंध ॥१९६॥
तया बुंधांतून । निघतां अंकुर । वाढला विस्तार । फांद्यांचा तो ॥१९७॥
तया फांद्यांतें हि । मग थोर सान । डहाळ्या फुटोन । पसरती ॥१९८॥
फुटे डहाळ्यांसी । पालवी कोंवळी । पानें तीं हि भलीं । कोंवळीं च ॥१९९॥
पालवीमधून । मग फूल फळ । ऐसें चि सकळ । वृक्षत्व हें ॥२००॥
परी पाहूं जातां । वृक्षाचा विस्तार । मूळ तें साचार । बीज एक ॥२०१॥
तैसें मूळारंभीं । तत्त्व मी एकलें । मग तें चि [४] व्यालें । मनालागीं ॥२०२॥
कश्यपादि मुनि । आणि मनु चार । तेथें चि साचार । उपजले ॥२०३॥
मग लोक-पाळ । तयांनीं निर्मिले । लोक-पाळीं केले । नाना लोक ॥२०४॥
आणि मग तयां । लोकां चि पासोन । जाहलें निर्माण । [५] प्रजाजात ॥२०५॥
ऐशापरी सर्व । विश्वीं एक मी च । माझा चि गा साच । पसारा हा ॥२०६॥
परी जयालागीं । मानेल हें वीरा । भावाचिया द्वारा । जाणेल तो ॥२०७॥

एतां विभूतिं योगं च मम यो वेत्ति तत्त्वत: ।

---

*परिशिष्ट पहा. १ रचना; व्यवस्था. २ उद्योगांत गर्क. ३ रुजल्यावर. ४ जन्म देतें झालें. ५ सर्व प्रजा.

सोऽविकम्पेन योगेन युज्यते नात्र संशयः ॥७॥

बुध्द्यादिक भाव । त्या माझ्या विभूति । व्यापोनि राहाती । जग सारें ॥२०८॥
म्हणोनि [१] ब्रह्मादि–। पिपीलिकावेरीं । वस्तु न दुसरी । मजविण ॥२०९॥
ज्ञानाची जागृति । झाली पूर्णपणें । जो हें तत्त्व जाणे । तयालागीं ॥२१०॥
तेणें उच्च-नीच–। भेदाचें दु:स्वप्न । गेलें मावळोन । तयाचें गा ॥२११॥
मग मी आणिक । माझिया विभूति । व्यापियेल्या व्यक्ति । तयांनीं ज्या ॥२१२॥
सकळ हीं एक । प्रतीति ऐसी च । तया आली साच । एकत्वाची ॥२१३॥
ऐशा नि:संदेह । ऐक्यभावें भला । मनोद्वारा झाला । मद्रूप जो ॥२१४॥
पार्था, कृतार्थता । पावला तो साच । संशय नाहीं च । येथें कांहीं ॥२१५॥
कीं जो ऐक्यभावें । मज भजे कोणी । तयाच्या भजनीं । मी च नांदें ॥२१६॥
म्हणोनि अभेद–। भक्तियोग चांग । सर्वथा अभंग । नि:शंक हा ॥२१७॥
आचरितां मध्यें । आला [२] प्रत्यवाय । तरी तो हि होय । सुखालागीं ॥२१८॥
सुखालागीं कैसा । होय तरी पाहीं । मागां षष्ठाध्यायीं । निरूपिलें ॥२१९॥
कैसी ती अभेद–। भक्ति ऐसा ध्वनि । जरी तुझे मनीं । तरी ऐक ॥२२०॥

अहं सर्वस्य प्रभवो मत्त: सर्वं प्रवर्तते ।
इति मत्वा भजन्ते मां बुधा भावसमन्विता: ॥८॥

सर्व जगालागीं । मी च जन्मदाता । सर्वांसी पोषिता । मी च एक ॥२२१॥
तरंगांचा जन्म । जळामाजीं होय । जळ चि आश्रय । तरंगांसी ॥२२२॥
आणि सर्वांठायीं । तयां जळ एक । जीवन हि देख । जळ चि तें ॥२२३॥
तैसा विश्वीं एक । मी च परिपूर्ण । नाहीं मजवीण । दुजें कांहीं ॥२२४॥
ओळखोनि ऐशा । सर्व-व्यापकातें । मज [३] भलतेथें । भजती जे ॥२२५॥
सत्य प्रेम-भावें । चित्त प्रफुल्लित । झालें अखंडित । जयांचें गा ॥२२६॥
जैसा नभोरूप । होवोनि नभांत । वायु [४] अविरत । खेळतसे ॥२२७॥
तैशापरी देश–। काळ-वर्तमान । सर्व हि मानोन । मद्रूप तें ॥२२८॥
जगद्रूपा मज । [५] आत्मज्ञ ते भक्त । भावें हृदयांत । सांठवोनि ॥२२९॥

---

१ ब्रह्मदेवापासून मुंगीपर्यंत. २ अडथळा. ३ कोठेंहि; (सर्वत्र). ४ सतत; निरंतर. ५ आत्मज्ञानीं.

त्रैलोक्यामाझारीं । सुखें निरंतर । करिती विहार । पंडुसुता ॥२३०॥
पडे दृष्टीलागीं । जगीं जो जो जीव । मानावा तो देव । मनोभावें ॥२३१॥
माझा भक्ति-योग । हा चि ऐसें जाण । निश्चयेंकरोन । *कपि-ध्वजा ॥२३२॥

मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्तः परस्परम् ।
कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च ॥९॥

जाहलें मद्रूप । भक्तांचें तें चित्त । प्राण तो हि तृप्त । मद्रूपीं च ॥२३३॥
जन्म-मरणाची । विसरले वार्ता । मद्रूपीं रंगतां । ज्ञानबोधें ॥२३४॥
मग बोधाचिया । [1] धुंदीमाजीं देख । नाचूं लागे सुख । संवादाचें ॥२३५॥
आतां एकमेकां । बोध चि तो द्यावा । बोध चि तो घ्यावा । ऐसें होय ॥२३६॥
जैसीं जवळील । सरोवरें दोन । तुडुंब भरोन । एक होती ॥२३७॥
उचंबळतां चि । मग परस्पर । तरंग आधार । तरंगांसी ॥२३८॥
एकमेकां भक्तां । तैसी भेटी होतां । उसळती लाटा । स्वानंदाच्या ॥२३९॥
तेथें आत्म-ज्ञान । शोभे आत्म-ज्ञानें । ज्ञानाचें च लेणें । लेवोनियां ॥२४०॥
पाहें धनंजया । जैसें एका सूर्या । यावें ओवाळाया । प्रतिसूर्यें ॥२४१॥
किंवा शीतरश्मि । चंद्रालागीं एका । भेटावा जणूं का । दुजा चंद्र ॥२४२॥
ना तरी संगम । तुल्य [2] जलौघांचा । व्हावा जैसा साचा । प्रयागीं तो ॥२४३॥
सामरस्याचा च । तैसा पूर लोटे । जेव्हां भक्त भेटे । भक्तालागीं ॥२४४॥
लोटतां तो पूर । तयावरी सांचे । *अष्ट सात्त्विकाचें । [3] पुराड तें ॥२४५॥
पार्था, संवादाचा । [4] चतुष्पथ भला । तेथें भक्त झाला । अधिपति ॥२४६॥
मग ब्रह्मानंद । येतां बहरून । जाय ओसरून । देह-भाव ॥२४७॥
रंगतां मद्रूपीं । भक्त तृप्त होती । उदंड गर्जती । धन्योद्गारें ॥२४८॥
सद्गुरु शिष्यासी । एकांतीं नेवोन । ॐकाराची खूण । दाखवी जी ॥२४९॥
तो चि उपदेश । मेघांच्या समान । सांगती गर्जोन । त्रैलोक्यासी ॥२५०॥
अंतरींचा राखूं । नेणे मकरंद । पद्म-कळी [5] मुग्ध । उमलतां ॥२५१॥
मग रायारंकां । सर्वांसी समान । देतसे भोजन । सुगंधाचें ॥२५२॥

१७

---

१ तंद्रींत. २ पाण्याच्या प्रवाहांचा. ३ गाळ; कचरा. ४ चौक; चव्हाटा. ५ न उमललेली; मिटलेली.

तैसे चि ते मातें । वर्णिती विश्वांत । स्वानंद-भरांत । येवोनियां ।।२५३।।
होतां संकीर्तनीं । [१] आनंद-निर्भर । बोलाचा विसर । पडे तयां ।।२५४।।
तया विसरांत । विरोनि ते जाती । अंगें-जीवें होती । तदाकार ।।२५५।।
नेणती ते रात्र । नेणती ते दिन । उरे कैसें भान । प्रेम-रंगीं ! ।।२५६।।
सर्वांगसंपूर्ण । ऐसें माझें सुख । करिती जे देख । आपुलेंसें ।।२५७।।

तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् ।
ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते ।।१०।।

तयां बहुमोल । जें जें आम्हीं द्यावें । लाधलें स्वभावें । आधीं चि तें ।।२५८।।
कीं ते जया पंथें । निघाले निःशंक । भोगावया सुख । सायुज्याचें ।।२५९।।
पाहोनि तो पंथ । स्वर्ग-मोक्ष पार्था । वाटती सर्वथा । आडमार्ग ।।२६०।।
म्हणोनि तयांनीं । प्रेम केलें साच । द्यावें जरी तें च । आम्हीं तयां ।।२६१।।
तयांनीं च आम्हां । करोनि स्वाधीन । आम्हांजवळून । घेतलें तें ।।२६२।।
तें चि प्रेम-सुख । आगळें वाढावें । आम्हीं तों करावें । एवढें च ! ।।२६३।।
पडूं नये तेथें । काळाची नजर । कर्तव्य साचार । आमुचें हें ।।२६४।।
लाडकें बाळक । खेळावया लागे । धांवे तयामागें । माउली ती ।।२६५।।
प्रेमाची [२] पाखर । घालोनि साचार । तया निरंतर । संरक्षिते ।।२६६।।
आणि बाळ मागे । खेळ जो जो कांहीं । करोनी तो देई । सोनियाचा ।।२६७।।
तैसा भक्तांचा तो । उपासना-मार्ग । [३] चोखाळोनि चांग । ठेवितों मी ।।२६८।।
तेणें चि ते योग्य । होती पंडु-सुता । सुखें सायुज्यता । पावावया ।।२६९।।
तयांच्या भक्तीचा । करावा [४] परिपोष । आवडे विशेष । हें चि मज ।।२७०।।
पाहें भक्तांसी तों । माझी च आवड । मज वाटे गोड । एक भाव ।।२७१।।
आमुचिया घरीं । साच दुर्मीळता । जाण पंडु-सुता । प्रेमळांची ।।२७२।।
जे का मोक्ष-काम । तयां दिली मुक्ति । तेविं स्वर्ग-प्राप्ति । स्वर्गेच्छूंस ।।२७३।।
काय सांगूं फार । आपुलें शरीर । वेंचिलें साचार । [५] इंदिरेसी ।।२७४।।
परी मुक्तीहून । आगळें निःशंक । ऐसें जें साजूक । प्रेम-सुख ।।२७५।।

---

१ आनंदाने भरून गेलेले. २ (पंखाची) साउली; संरक्षण. ३ स्वच्छ करून. ४ वाढ. ५ लक्ष्मीला.

पार्था, आमुचिया । प्रेमळासाठींच । ठेविलें तें साच । राखोनियां ॥२७६॥
ऐशापरी आम्ही । वेंचोनि सकळ । करितों जवळ । प्रेमळांसी ॥२७७॥
काय सांगूं ऐशा । नव्हेत ह्या गोष्टी । कीं ज्या [1]सामावती । बोलामाजीं ॥२७८॥

तेषामेवाऽनुकम्पार्थमहमज्ञानजं तमः ।
नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता ॥११॥

म्हणोनियां मज । आत्मयाचा भाव । केला ज्यांनीं ठाव । जगावया ॥२७९॥
मज एकाविण । सर्व हि असार । ऐसी च साचार । [2]मति ज्यांची ॥२८०॥
तयां शुद्धज्ञानी–। भक्तांपुढें मी च । मशालजी साच । होवोनियां ॥२८१॥
ज्ञान-कर्पूराचा । पोत पाजळीत । दाखवीत वाट । चालूं लागें ॥२८२॥
अज्ञानाच्या रात्री–। माझारीं अंधार । दाटतां अपार । भक्तांपुढें ॥२८३॥
स्वयें मी च दूर । सारितां तो होय । नित्य ज्ञानोदय । तयांलागीं ॥२८४॥
देखा भक्तांलागीं । प्रिय जो अत्यंत । देव भगवंत । नारायण ॥२८५॥
बोलतां तो ऐसें । काय म्हणे पार्थ । प्रभो, मन शांत । झालें माझें ॥२८६॥
संसाराचा सारा । झाडोनियां मळ । मज तूं निर्मळ । केलें देवा ॥२८७॥
जन्म-मरणाचे । संपले सायास । नाहीं गर्भवास । आतां मज ॥२८८॥
आपुलें जनन । आपुलिया डोळां । देखिलें दयाळा । आज येथें ! ॥२८९॥
[3]गमे हें जीवन । माझ्या चि स्वाधीन । झालें आत्म-ज्ञान । म्हणोनियां ॥२९०॥
तुमचिया मुखें । झाला उपदेश । कृपा ही विशेष । मजवरी ॥२९१॥
धन्य केलें मज । देवा नारायणा । भक्ताचिया खुणा । दाखवोनि ॥२९२॥
आज भाग्याचा हा । पातला सुदिन । सफल जीवन । झालें माझें ॥२९३॥
अंतर्बाह्य [4]तम । गेलें [5]निरसोन । तुझिया वचन–। तेजाकारें ॥२९४॥
म्हणोनि स्वरूप । आज तुझें देवा । देखिलें केशवा । [6]यथार्थत्वें ॥२९५॥

अर्जुन उवाच–
परं ब्रह्म परं धाम पवित्रं परमं भवान् ।
पुरुषं शाश्वतं दिव्यमादिदेवमजं विभुम् ॥१२॥

---

१ राहतील; मावतील. २ बुद्धि. ३ वाटते. ४ काळोख. ५ नाहींसें होऊन. ६ सत्यपणें.

महाभूतांचें जें । विश्रांतीचें स्थान । तूं चि तें निर्वाण । परब्रह्म ।।२९६।।
परम पावन । तूं चि जगन्नाथ । [1] आराध्य दैवत । तिन्ही देवां ।।२९७।।
* चोवीस तत्त्वांच्या । पलीकडे साजे । पंचविसावें जें । दिव्य तत्त्व ।।२९८।।
जया सांख्य देती । 'पुरुष' हें नांव । तो तूं स्वामी देव । नित्य-सिद्ध ।।२९९।।
होसी अजन्मा तूं । प्रकृतिपरता । हें चि आम्हीं आतां । ओळखिलें ।।३००।।
तूं चि काळरूप–। यंत्र-सूत्रधार । तूं एक आधार । जीवनासी ।।३०१।।
आणि ब्रह्मांडाचें । तूं चि [2] अधिष्ठान । ऐसें स्पष्ट ज्ञान । झालें मज ।।३०२।।

आहुस्त्वामृषय: सर्वे देवर्षिर्नारदस्तथा ।
असितो देवलो व्यास: स्वयं चैव ब्रवीषि मे ।।१३।।

आणिक हि एके । परी थोरपण । येई समजोन । तुझें मज ।।३०३।।
कीं तें थोरपण । ऐकिलें पूर्वी च । वर्णिलें जें साच । महर्षींनीं ।।३०४।।
तयाची प्रचीति । परी आतां आली । तुम्हीं कृपा केली । म्हणोनियां ।।३०५।।
नारद ऐसें चि । करी गुण-गान । अखंड बैसोन । आम्हांपाशीं ।।३०६।।
परी तयाचें तों । रहस्य नेणोन । होतसों तल्लीन । गीत-सुखीं ।।३०७।।
अहो जी गोविंदा । आंधळ्यांच्या गांवीं । स्वयें जरी रवि । प्रकटला ।।३०८।।
तरी तयां होय । उन्हाची च सोय । परी दिसे काय । प्रकाश तो ? ।।३०९।।
एऱ्हवीं देवर्षि । अध्यात्माचें गीत । राग-रागिणींत । आळवितां ।।३१०।।
गीत-माधुरीचें । वरिवरी सुख । कळे ना आणिक । दुजें आम्हां ।।३११।।
असित देवल । महर्षींनीं साच । आम्हांसी तैसें च । सांगितलें ।।३१२।।
परी विषयांच्या । विषें मति [3] व्याप्त । झाली होती तेथ । तिये वेळीं ।।३१३।।
आणिकांचें तुज । काय सांगूं आतां । व्यासदेवें स्वतां । येवोनियां ।।३१४।।
आमुच्या मंदिरीं । तुझें चि वर्णन । करावें संपूर्ण । निरंतर ।।३१५।।
परि चिंतामणि । देखिला अंधारीं । सारावा तो दूरी । नोळखोनि ।।३१६।।
मग सूर्योदय । होतां चि तो जैसा । चिंतामणि ऐसा । ओळखावा ।।३१७।।
तैसे व्यासादिक । महर्षींचे बोल । खाणी त्या अमोल । [4] चिद्रत्नांच्या ।।३१८।।

---

* परिशिष्ट पहा. १ आराधना (पूजा) करावयाजोगें. २ आधार. ३ भरून राहिलेली. ४ ज्ञानरूप रत्नांच्या.

D:\Dyaneshwari_2007\ADA10_247-276 ....260

असोनि समीप । उपेक्षिल्या पूर्ण । सूर्या तुजविण । कृष्ण-देवा ।।३१९।।

सर्वमेतदृतं मन्ये यन्मां वदसि केशव ।
न हि ते भगवन्व्यक्तिं विदुर्देवा न दानवा: ।।१४।।

आतां तुझीं वाक्यें । हे चि सूर्य-कर । फांकतां साचार । [1] मदंतरीं ।।३२०।।
महर्षींनीं जे जे । सांगितले मार्ग । आकळले चांग । सर्व हि ते ।।३२१।।
हृदय-भूमींत । पडलें सखोल । ज्ञान-बीज बोल । तयांचे ते ।।३२२।।
तुझिया कृपेचें । लाभतां चि ओल । संवादें सफल । झालें मग ।।३२३।।
अहो नारदादि । संतांच्या ज्या [2] उक्ति । घोघावत येती । नद्या जैशा ।।३२४।।
तयांलागीं झालों । सागर मी साचा । संवाद-सुखाचा । आज येथें ।।३२५।।
जन्मजन्मान्तरीं । आजवरी येथ । केलें जें सुकृत । सर्वोत्तम ।।३२६।।
तेणें तूं सद्गुरु । जोडलासी मज । फळा आलें काज । आज ऐसें ।।३२७।।
वाडवडिलांचे । मुखें तुझे गुण । होते निशि-दिन । येत कानीं ।।३२८।।
परी नोळखिलें । तुझिया स्वरूपा । नव्हती जों कृपा । एक तुझी ।।३२९।।
केले यत्न होती । सदैव सफळ । दैव सानुकूळ । असे जरी ।।३३०।।
तैसें जें आपण । करावें साधन । श्रवण-पठण–। मननादि ।।३३१।।
तयाचा तों घ्यावा । तेव्हां चि प्रत्यय । गुरुकृपा होय । जिये वेळीं ।।३३२।।
करोनियां श्रम । नित्य जिवापाड । माळी जरी झाड । वाढवितो ।।३३३।।
तरी तो वसंत । तया जेव्हां भेटे । तेव्हां चि तें लोटे । फळ-भारें ।।३३४।।
विषम-ज्वरासी । पडतां उतार । गोड तें साचार । गोड लागे ।।३३५।।
तेव्हां चि तें ठरे । [3] रसायन चांग । आरोग्यें सर्वांग । भरे जेव्हां ।।३३६।।
चैतन्य आपण । येवोनियां जरी । शरीरामाझारीं । संचरेल ।।३३७।।
तरी च इंद्रियें । वाचा आणि प्राण । सर्व तीं असोन । सार्थ होती ।।३३८।।
तैसें वेदशास्त्र । जें का अभ्यासिलें । साधन जें केलें । योगादिक ।।३३९।।
तेव्हां चि तें सर्व । आपुलेंसें होय । जेव्हां गुरुराय । कृपा करी ।।३४०।।
येतां प्रत्ययास । श्रीकृष्ण-स्वरूप । पार्थासी [4] अमूप । [5] तोष झाला ।।३४१।।

---

१ माझ्या अंत:करणांत. २ बोलणीं; वाक्यें. ३ औषध. ४ खूप; पुष्कळ. ५ आनंद.

[1] प्रत्ययाच्या माजें । मग नाचूं लागे । रूप तें निजांगें । निर्धारोनि ॥३४२॥
तेविं म्हणे देवा । बोलिलें जें तुवां । आलें अनुभवा । सर्व हि तें ॥३४३॥
देव-दानवांच्या । बुद्धीसी निश्चय । सर्वथा न होय । [2] त्वद्रूपाचा ॥३४४॥
हें तों नि:संदेह । आकळलें येथें । साच [3] मोक्ष-पते । मजलागीं ॥३४५॥
उपदेशाविण । झालें ज्ञान साच । निज-बुद्धीनें च । आपणातें ॥३४६॥
ऐसें म्हणे कोणी । तरी तें अज्ञान । प्रत्ययें ही खूण । कळों आली ॥३४७॥

स्वयमेवात्मनात्मानं वेत्थ त्वं पुरुषोत्तम ।
भूतभावन भूतेश देवदेव जगत्पते ॥१५॥

नभें चि जाणावा । नभाचा विस्तार । पृथ्वीचा तो भार । पृथ्वीनें च ॥३४८॥
सर्व सामर्थ्यानें । तैसा तुझा तूं च । ओळखसी साच । आपणातें ॥३४९॥
एऱ्हवीं इतर । वेदादिक सर्व । वायां ज्ञान-गर्व । वाहती ते ॥३५०॥
मनोवेगालागीं । सांडोनियां मागें । पुढें कैसी सांगें । धांव घ्यावी ॥३५१॥
वीत हात वांवा । घालोनियां काय । माप केलें जाय । पवनाचें ? ॥३५२॥
काय सांगें थोर । झालें बाहु-बल । तरी तरवेल । माया-नदी ? ॥३५३॥
तैसें तुझें ज्ञान । होणें अघटित । म्हणोनि तूं ज्ञात । नाहीं कोणा ॥३५४॥
जाणावया तुज । तुझा तूं समर्थ । कळलें यथार्थ । आतां मज ॥३५५॥
जाणोनियां स्वत: । आपणा आपण । आणिकातें खूण । सांगावया ॥३५६॥
तूं चि एक देवा । समर्थ म्हणोन । तुज विनवून । सांगतों हें ॥३५७॥
माझिया इच्छेच्या । निढळावरील । प्रभो एक वेळ । घाम पूसीं ॥३५८॥
त्रिभुवनरूपी । [4] कुंजरालागोन । होसी पंचानन । तूं चि देवा ॥३५९॥
देव-देवतांसी । साच पूजनीय । स्वरूप तें होय । एक तुझें ॥३६०॥
[5] भूत-भावना तूं । होसी जगन्नाथ । क्षणभरी चित्त । द्यावें आतां ॥३६१॥
तुजपाशीं उभें । रहावयातें हि । मी तों योग्य नाहीं । सर्वथैव ॥३६२॥
म्हणोनियां खेद । वाटे माझ्या मना । ऐसा थोरपणा । तुझा देवा ॥३६३॥
परी भिवोनियां । नच विनवावें । तरी ओळखावें । कैसें तुज ? ॥३६४॥

---

१ स्वानुभवाच्या गुंगींत. २ तुझ्या रूपाचा. ३ मोक्षाचा स्वामी. ४ हत्तीला. ५ जग उत्पन्न करणाऱ्या.

भरले सागर । पूर्ण चोहींकडे । तरी ते कोरडे । *चातकासी ॥३६५॥
गळतील थेंब । जरी मेघांतून । तरी च तहान । भागे त्याची ॥३६६॥
तैसें [1] गुरु-तत्त्व । सर्वत्र तें साच । परी कृष्णा तूं च । गति आम्हां ॥३६७॥

वक्तुमर्हस्यशेषेण दिव्या ह्यात्मविभूतयः ।
याभिर्विभूतिभिर्लोकानिमांस्त्वं व्याप्य तिष्ठसि ॥१६॥

असो हें सकळ । तुझ्या चि *विभूति । परी [2] दिव्य-शक्ति । व्याप्त ज्या ज्या ॥३६८॥
त्या त्या मज आतां । द्याव्या दाखवोनि । ही च विनवणी । पायापाशीं ॥३६९॥
ज्या ज्या विभूतींनीं । समस्त हे लोक । व्यापोनि तूं एक । राहिलासी ॥३७०॥
त्या त्या मुख्य मुख्य । आणि नामांकित । विभूति प्रकट । करीं देवा ॥३७१॥

कथं विद्यामहं योगिंस्त्वां सदा परिचिन्तयन् ।
केषु केषु च भावेषु चिन्त्योऽसि भगवन्मया ॥१७॥

कोण्या स्वरूपांत । तुज ओळखून । करावें चिंतन । नित्य तुझें ॥३७२॥
नित्य सर्वांठायीं । तूं च म्हणूं जरी । चिंतन तें तरी । घडे कैसें ? ॥३७३॥
म्हणोनियां पूर्वीं । तुवां सांगितले । भाव जे आपुले । थोडक्यांत ॥३७४॥
ते चि आतां येथें । विस्तारेंकरोन । द्यावे दाखवोन । मजलागीं ॥३७५॥
ज्या ज्या विभूतीचें । करितां चिंतन । सहजें स्मरण । होय तुझें ॥३७६॥
तो तुझा विभूति-। योग विवरोनि । सांगें चक्र-पाणि । मज आतां ॥३७७॥

विस्तरेणात्मनो योगं विभूतिं च जनार्दन ।
भूयः कथय तृप्तिर्हि शृण्वतो नास्ति मेऽमृतम् ॥१८॥

आणि जगन्नाथा । विभूति-विस्तार । पुसिला साचार । तो हि सांगें ॥३७८॥
तें चि तें सांगावें । किती वारंवार । म्हणसी साचार । जरी ऐसें ॥३७९॥
तरी मनामाजीं । देवा जनार्दना । नको हि कल्पना । येवों देवों ॥३८०॥
सर्वथा [3] प्राकृत । अमृत जें तें हि । म्हणों येत नाहीं । पुरे ऐसें ॥३८१॥
काळकूटाचें जें । होय [4] सहोदर । मृत्यु-भयें [5] सुर । प्राशिती जें ॥३८२॥
तरी हि एका चि । *ब्रह्मदेव-दिनीं । [6] लोपती जन्मोनि । चौदा इंद्र ! ॥३८३॥

---

*परिशिष्ट पहा. १ ब्रह्म. २ थोर सामर्थ्यसंपन्न. ३ सामान्य. ४ भावंड. ५ देव. ६ नाहींसे होतात.

अमृतपणाचा । जया व्यर्थ भास । ऐसा जो का रस । क्षीराब्धीचा ।।३८४।।
तयाची हि गोडी । पुरे झाली जीवा । म्हणवेना देवा । ऐसें कोणा ।।३८५।।
क्षुद्र अमृताचा । ऐसा बडिवार । हें तव साचार । परमामृत ।।३८६।।
[१] मंदराचळाचा । न करितां [२] मंथा । न च घुसळितां । क्षीराब्धीतें ।।३८७।।
अनादि आइतें । सिद्ध स्वयमेव । नव्हे जें का द्रव । नव्हे बद्ध ।।३८८।।
रस-गंधाची तों । नाहीं वार्ता जेथ । स्मरतां चि प्राप्त । कोणातें हि ।।३८९।।
आघवा संसार । होतसे असार । जयातें साचार । ऐकतां चि ।।३९०।।
आणि सर्वश्रेष्ठ । अविनाशपण । ठायीं च संपूर्ण । लाभतसे ।।३९१।।
जन्म-मरणाचा । बोल जो केवळ । जाय तो समूळ । हारपोनि ।।३९२।।
जें का ऐकतां च । वाढूं लागे एक । नित्य ब्रह्मसुख । अंतर्बाह्य ।।३९३।।
करावें सेवन । तें चि ऐसा योग । जरी आला मग । थोर भाग्यें ।।३९४।।
तरी सेवित्यासी । तद्रूपता येत । ऐसें परमामृत । थोर जें का ।।३९५।।
तें तूं आज येथें । पाजितोसी मातें । तरी काय तूतें । पुरे म्हणों ? ।।३९६।।
तुझें नाम तें हि । आवडे आम्हासी । वरी भेटलासी । दैवयोगें ।।३९७।।
तशांत हि तुझा । नित्य सहवास । घडला आम्हांस । आजवरी ।।३९८।।
आतां आम्हांलागीं । आनंदभरांत । ऐसें बोधामृत । पाजिसी तूं ।।३९९।।
सुखाची ह्या गोडी । वर्णवेना मज । अंतरीं सहज । समाधान ।।४००।।
तुझ्या मुखें झाली । होवो [३] पुनरुक्ति । परी त्या विभूति । सांगें मज ।।४०१।।
नभीं प्रतिदिन । उगवे म्हणोन । शिळा म्हणे कोण । सूर्यालागीं ? ।।४०२।।
अग्निनारायणें । नाहीं केलें स्नान । होय का म्हणोन । ओंवळा तो ? ।।४०३।।
वाहे निरंतर । गंगेचें जें तोय । म्हणों ये तें काय । शिळें ऐसें ? ।।४०४।।
तुझ्या मुखें देवा । निघती जे शब्द । मूर्तिमंत * नाद–। ब्रह्म तें चि ।।४०५।।
चंदनवृक्षाचें । [४] तुरंबावें फूल । तैसे तुझे बोल । सुगंधित ।।४०६।।
अर्जुनाचें ऐसें । ऐकोनि भाषण । सर्वांगें श्रीकृष्ण । डोलूं लागे ।।४०७।।
म्हणे ऐकावया । हा चि एक [५] पात्र । जाहला [६] सु-क्षेत्र । भक्ति-ज्ञाना ।।४०८।।

---

१ मंदर पर्वताचा. २ रवी. ३ पुन:पुन: सांगणें. ४ हुंगावें. ५ अधिकारी ६ उत्तम जागा.

प्रिय भक्ताचा तो । पाहोनि संतोष । प्रेम-सिंधु ईश । उचंबळे ॥४०९॥
परी आवरोनि । यत्नें प्रेमावेग । मग तो श्रीरंग । काय बोले ॥४१०॥

श्रीभगवानुवाच–
हंत ते कथयिष्यामि दिव्या ह्यात्मविभूतयः ।
प्राधान्यतः कुरुश्रेष्ठ नास्त्यन्तो विस्तरस्य मे ॥१९॥

ब्रह्मदेवाचा हि । असोनि तो बाप । आपुला प्रताप । नाठवोनि ॥४११॥
म्हणे पार्था बापा । भलें केलें आज । बोलविलें मज । भक्ति-बळें ॥४१२॥
पार्थालागीं बापा । ऐसें म्हणें देव । नाहीं [1] नवलाव । येथें आम्हां ॥४१३॥
कीं तो नव्हे काय । नंदाचें लेंकरूं । स्वयें जगद्गुरु । असोनि हि ॥४१४॥
असो हा विस्तार । आवडीचा भर । म्हणोनि श्रीधर । बोले ऐसें ॥४१५॥
म्हणे आतां ऐकें । सांगतों विभूति । तुवां मजप्रति । पुसिल्या ज्या ॥४१६॥
परी त्या असंख्य । म्हणोनि अर्जुना । मोजतां येती ना । माझ्या मज ॥४१७॥
आपुल्या शरीरीं । [2] रोम-रंध्रें किती । न होय गणति । ज्याची त्यास ॥४१८॥
तैसा तो अपार । विभूति-विस्तार । म्हणोनि साचार । आकळेना ॥४१९॥
एऱ्हवीं मी कैसा । केवढा हें साच । कळे ना माझें च । मजलागीं ॥४२०॥
तरी मुख्य मुख्य । विख्यात ज्या होती । सांगतों विभूति । त्या चि आतां ॥४२१॥
जैसें मुठीमाजीं । सांपडतां बीज । वृक्षत्व सहज । हाता येतें ॥४२२॥
तैसें तयांचें तों । होतां तुज ज्ञान । होय आकलन । सर्वांचें हि ॥४२३॥
नातरी उद्यान । जरी हाता आलें । येती फळें फुलें । [3] स्वभावें चि ॥४२४॥
तैशा ज्या विभूति । जाणतां केवळ । जाणवे सकळ । विश्व तुज ॥४२५॥
एऱ्हवीं विस्तारा । नाहीं माझ्या अंत । सुखें लपे ज्यांत । गगन हि ॥४२६॥

अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः ।
अहमादिश्च मध्यं च भूतानामन्त एव च ॥२०॥

तुझिया मस्तकीं । कुरळे हे केंस । शोभती विशेष । [4] गुडाकेशा ॥४२७॥
धनुर्विद्येमाजीं । जणूं [5] त्रि-लोचन । ऐसा तूं प्रवीण । होसी पार्था ॥४२८॥

---

१ नवल. २ अंगावरील केसांच्या मुळाशीं असलेलीं छिद्रे. ३ सहजच. ४ अर्जुना. ५ शंकर.

सुरूप सुधीर । तूं चि नर-वीर । विभूति-विस्तार । ऐक माझा ।।४२९।।
असे आत्मा जो का । प्राणिमात्रीं एक । मी चि तो नि:शंक । जाण ऐसें ।।४३०।।
भूतां अंतर्बाह्य । व्यापोनि मी राहें । आदि-अंतीं आहें । मध्यें हि मी ।।४३१।।
मेघांलागीं जैसें । खालींवरी एक । आकाश चि देख । अंतर्बाह्य ।।४३२।।
आणि आकाशीं च । होवोनि उत्पन्न । राहती ते जाण । आकाशीं च ।।४३३।।
मग जिये वेळीं । पावती [१] विलय । आकाशीं च लय । होय त्यांचा ।।४३४।।
तैशा रीती मी च । आदि स्थिति अंत । अर्जुना समस्त । [२] भूत-ग्रामा ।।४३५।।
विभूति-योगें हा । व्यापक विस्तार । ऐसा चि साचार । जाण माझा ।।४३६।।
आतां जीवाचे च । करोनियां कान । देईं अवधान । धनंजया ।।४३७।।
ज्ञान हें केलें चि । करावें श्रवण । तें चि तें सांगेन । जरी तुज ।।४३८।।
जाणतां चि एक । स्वरूप व्यापक । कायसें कौतुक । विभूतिंचें ।।४३९।।
जरी बोलिलों मी । सांगेन म्हणोन । तरी ज्या [३] प्रधान । त्या चि ऐक ।।४४०।।

आदित्यानामहं विष्णुर्ज्योतिषां रविरंशुमान् ।
मरीचिर्मरुतामस्मि नक्षत्राणामहं शशी ।।२१।।

बोलोनियां ऐसें । मग कृपावंत । म्हणे * आदित्यांत । विष्णु तो मी ।।४४१।।
मी च तेजस्व्यांत । रवि रश्मिवंत । * मरुत्समूहांत । मरीचि मी ।।४४२।।
नभीं नक्षत्रांत । चंद्र मी साचार । म्हणे [४] शार्ङ्गधर । पार्थालागीं ।।४४३।।

वेदानां सामवेदोऽस्मि देवानामस्मि वासव: ।
इन्द्रियाणां मनश्चास्मि भूतानामस्मि चेतना ।।२२।।

मरुद्बंधु इंद्र । देवांमाजीं मी च । वेदांमाजीं साच । सामवेद ।।४४४।।
इंद्रियांमाझारीं । अकरावें मन । तें मी ऐसें जाण । कुंती-सुता ।।४४५।।
प्राणिमात्रांमाजीं । जी का स्वाभाविक । चेतना ती देख । मी च आहें ।।४४६।।

रुद्राणां शंकरश्चास्मि वित्तेशो यक्षरक्षसाम् ।
वसूनां पावकश्चास्मि मेरु: शिखरिणामहम् ।।२३।।

सर्व रुद्रांमाजीं । शिव [५] मदनारि । मी च तो निर्धारीं । धनुर्धरा ।।४४७।।

---

* परिशिष्ट पहा. १ विरुन जातात. २ प्राण्यांच्या समुदायाला. ३ मुख्य. ४ श्रीकृष्ण. ५ शंकर.

यक्षराक्षसांत । धनवंत जो कां । तो श्रीशंभु-सखा । कुबेर मी ॥४४८॥
* अष्टवसूंमाजीं । अग्नि तो मी साच । पर्वतांत उंच । मेरु तो मी ॥४४९॥

पुरोधसां च मुख्यं मां विद्धि पार्थ बृहस्पतिम् ।
सेनानीनामहं स्कन्दः सरसामस्मि सागरः ॥२४॥

महर्षीणां भृगरहं गिरामस्म्येकमक्षरम् ।
यज्ञानां जपयज्ञोऽस्मि स्थावराणां हिमालयः ॥२५॥

जयाचें साहाय्य । [१] स्वर्ग-सिंहासना । जो का सर्वज्ञाना । [२] आदिपीठ ॥४५०॥
पुरोहितांमाजीं । तो मी बृहस्पति । म्हणे रमा-पति । ऐक पार्था ॥४५१॥
महेशाच्या वीर्यें । अग्नि-संगें जाण । कृत्तिकांपासोन । जन्म ज्याचा ॥४५२॥
तो मी * कार्तिकेय । स्वामी सुविख्यात । मुख्य सेनानींत । त्रिलोकींच्या ॥४५३॥
अर्जुना, सकळ । जळाशयीं साच । सागर तो मी च । जळराशि ॥४५४॥
महर्षिमाझारीं । तपस्वी जो थोर । जाण ऋषीश्वर । भृगु तो मी ॥४५५॥
सर्व वाणींमाजीं । सत्याचा उत्कर्ष । नित्य निर्विशेष । नांदे जेथें ॥४५६॥
तो मी एकाक्षर । ॐकार निर्मळ । बोलिला [३] वेल्हाळ । [३] वैकुंठींचा ॥४५७॥
जो का कर्मादिक । साधनावांचोन । [४] होतसे [४] निष्पन्न । इह-लोकीं ॥४५८॥
प्रणव-स्वरूपें । येई प्रत्ययास । पार्था ज्याचा त्यास । अंतरीं च ॥४५९॥
सर्व यज्ञांमाजीं । तो मी सोऽहंजप–। यज्ञ आपोआप । होय जो का ॥४६०॥
स्थावरामाझारीं । पर्वतांमधील । जो का [५] हिमाचल । पुण्य-राशि ॥४६१॥
तो मी जाण ऐसें । बोलिला श्रीपति । आपुल्या विभूति । निवेदितां ॥४६२॥

अश्वत्थः सर्ववृक्षाणां देवर्षीणां च नारदः ।
गन्धर्वाणां चित्ररथः सिद्धानां कपिलो मुनिः ॥२६॥
उच्चैःश्रवसमश्वानां विद्धि माममृतोद्भवम् ।
ऐरावतं गजेन्द्राणां नराणां च नराधिपम् ॥२७॥

पार्था, कल्पद्रुम । आणि पारिजात । गुणें सुविख्यात । चंदन हि ॥४६३॥
परी सर्व वृक्षां–। माजीं जो पिंपळ । तो मी श्रीगोपाळ । म्हणे ऐसें ॥४६४॥

---

१ स्वर्गातील राजाला; इंद्राला. २ मूळचें स्थान. ३ विष्णु; श्रीकृष्ण. ४ सिद्ध होतो. ५ हिमालय.

चित्ररथ तो मी । सर्व गंधर्वांत । जाण देवर्षींत । नारद मी ॥४६५॥
सर्व सिद्धांमाजीं । जो का मुनिवर्य । तो मी *कपिलाचार्य । [1]प्रज्ञावंता ॥४६६॥
पार्था, सुप्रसिद्ध । अश्वांमाजीं सर्व । *उच्चै:श्रवा अश्व । तो हि मी च ॥४६७॥
क्षीर-सागराचें । करितां मंथन । निघे तयांतून । ऐरावत ॥४६८॥
तो मी सकल हि । हत्तींमाजीं जाण । होती जे भूषण । भूपतींसी ॥४६९॥
होवोनियां प्रजा । सर्व लोक पार्था । सेविती सर्वथा । जयालागीं ॥४७०॥
तो हि जाण माझा । विभूतिविशेष । होय जो नरेश । नरांमाजीं ॥४७१॥

आयुधानामहं वज्रं धेनूनामस्मि कामधुक् ।
प्रजनश्चास्मि कंदर्प: सर्पाणामस्मि वासुकि: ॥२८॥

अनन्तश्चास्मि नागानां वरुणो यादसामहम् ।
पितृणामर्यमा चास्मि यम: संयमतामहम् ॥२९॥

वज्र तें मी जाण । [2]आयुधांमाझारीं । इंद्राचिया करीं । शोभतें जें ॥४७२॥
धेनूंमाजीं मी च । काम-धेनु जाण । म्हणे [3]विष्वक्सेन । अर्जुनासी ॥४७३॥
जन्मवित्यांमाजीं । जो का रति-पति । माझी च विभूति । मदन तो ॥४७४॥
सर्पकुळामाजीं । वासुकी मी श्रेष्ठ । नागांत वरिष्ठ । अनंत मी ॥४७५॥
जळ-देवतांत । पश्चिमेचा स्वामी । वरुण जो तो मी । म्हणे देव ॥४७६॥
अर्यमा नामक । पितृ-देवता जी । विभूति ती माझी । पितृगणीं ॥४७७॥
शुभाशुभ कर्में । ठेवितो लिहोन । हिशेब घेवोन । [4]मानसाचा ॥४७८॥
कर्म तैसें फळ । देवोनियां मग । सुख-दु:ख-भोग । भोगविती ॥४७९॥
[5]निग्रहानुग्रह-। कर्ते ऐसे जे का । होती यमलोका-। माजीं कोणी ॥४८०॥
त्यांत कर्मसाक्षी । तो मी यम-धर्म । म्हणे आत्माराम । रमा-पति ॥४८१॥

प्रल्हादश्चास्मि दैत्यानां काल: कलयतामहम् ।
मृगाणां च मृगेन्द्रोऽहं वैनतेयश्च पक्षिणाम् ॥३०॥

प्रल्हाद मी देख । दैत्य-कुळीं भक्त । होई ना जो लिप्त । दैत्य-भावें ॥४८२॥
ग्रासितयांमाजीं । जो का महाकाळ । तो मी श्रीगोपाळ । सांगे ऐसें ॥४८३॥

---

१ बुद्धिमान अर्जुना.　२ शस्त्रांत.　३ श्रीकृष्ण.　४ मनाचा.　५ शिक्षा किंवा दया करणारे.

हिंस्र पशूंमाजीं । जो का [1] पंचानन । विभूति ती जाण । माझी च गा ॥४८४॥
पक्ष्यांत गरुड । तो मी अवधारीं । मज पाठीवरी । वाहूं शके ॥४८५॥

पवन: पवतामस्मि राम: शस्त्रभृतामहम् ।
झषाणां मकरश्चास्मि स्रोतसामस्मि जान्हवी ॥३१॥

[2] वसुंधरेचिया । विस्तारामाझारीं । वेळ घडीभरी । न लागतां ॥४८६॥
सात हि सागरां । एका चि उड्डाणें । प्रदक्षिणा जेणें । करावी गा ॥४८७॥
ऐशा वेगवंतां–। माजीं जो पवन । तो मी ऐसें जाण । पंडु-सुता ॥४८८॥
शस्त्रधरांमाजीं । सद्गुण-समुद्र । प्रभु रामचंद्र । तो मी जाण ॥४८९॥
सांपडतां धर्म । संकटीं साचार । तयाचा कैवार । घेवोनियां ॥४९०॥
घेवोनियां हातीं । जेणें धनुर्बाण । आणिली खेंचोन । विजयश्री ॥४९१॥
सुवेल नामक । पर्वताच्या माथां । ठाकोनियां *त्रेता–। युगीं जेणें ॥४९२॥
लंकाधीश महा–। प्रतापी रावण । तयाचीं छेदोन । दाही शिरें ॥४९३॥
दिलीं भक्षाया तीं । निशाचरां–हातीं । आकाशीं नाचती । आनंदें जीं ॥४९४॥
देवांचा लौकिक । जेणें [3] संशोधिला । स्वधर्माचा केला । जीर्णोद्धार ॥४९५॥
सूर्यवंशामाजीं । तेजोराशि भला । जो का उगवला । प्रतिसूर्य ॥४९६॥
तो मी सीता-कांत । अयोध्येचा नाथ । शस्त्रधारकांत । रामचंद्र ॥४९७॥
जळचरांमाजीं । [4] सपुच्छ मकर । विभूति साचार । माझी च ती ॥४९८॥
भगीरथें गंगा । स्वर्गांतूनि खालीं । आणितां गिळिली । *जन्हूनें ती ॥४९९॥
मग मांडींतून । सोडिली ती पुन्हां । करितां प्रार्थना । भगीरथें ॥५००॥
ऐसी *जान्हवी जी । त्रिलोकीं प्रख्यात । सर्व जलौघांत । जाण ती मी ॥५०१॥
असो, सृष्टींतील । ह्यापरी एकैक । विभूति त्या देख । वर्णूं जातां ॥५०२॥
जन्मसहस्रांत । धनंजया, पाहीं । न होती अर्ध्या हि । [5] विवरून ॥५०३॥

सर्गाणामादिरन्तश्च मध्यं चैवाहमर्जुन ।
अध्यात्मविद्या विद्यानां वाद: प्रवदतामहम् ॥३२॥

अक्षराणामकारोऽस्मि द्वन्द्व: सामासिकस्य च ।

---

*परिशिष्ट पहा. १ सिंह. २ पृथ्वीच्या. ३ पुन:प्रस्थापित केला. ४ शेपूट असलेला. ५ स्पष्टपणें सांगून.

अहमेवाक्षयः कालो धाताऽहं विश्वतोमुखः ॥३३॥

[१] आघवीं नक्षत्रें । वेंचोनियां घ्यावीं । ऐसी इच्छा जीवीं । जरी झाली ॥५०४॥
तरी धनंजया । गगनाची मोट । बांधावया नीट । हवी जैसी ॥५०५॥
पृथ्वीवरी किती । परमाणु होती । तयांची गणति । करूं जावें ॥५०६॥
तरी भूगोल चि । अर्जुना आघवा । धरावया हवा । कांखेमाजीं ॥५०७॥
तैसा देखावया । विभूतिविस्तार । मातें चि साचार । ओळखावें ॥५०८॥
फळें फुलें शाखा । एकावेळीं हातीं । यावीं ऐसें चित्तीं । जरी वाटे ॥५०९॥
तरी वृक्षाचें तें । मूळ उपटोनि । स्वाधीन करोनि । घ्यावें जैसें ॥५१०॥
तैसें जरी माझे । विभूतिविशेष । कळावे अशेष । ऐसें वाटे ॥५११॥
तरी निर्विकार । स्वरूप निर्मळ । जाणावें केवळ । एक माझें ॥५१२॥
एऱ्हवीं अर्जुना । वेगळाल्या किती । तूं माझ्या विभूति । ऐकशील ? ॥५१३॥
तरी एकदांच । जाण बुद्धिमंता । सर्व हें तत्त्वतां । मी च आहें ! ॥५१४॥
वस्त्रामाजीं जैसें । एक चि तें सूत । राहे ओतप्रोत । भरूनियां ॥५१५॥
तैसा सृष्टीचिया । आदि मध्यें अंतीं । राहिलों किरीटी । मी च एक ॥५१६॥
सर्वव्यापकाचें । माझें होतां ज्ञान । नुरे [२] प्रयोजन । विभूतींचें ॥५१७॥
परी तैसा नव्हे । तुझा अधिकार । आतां हा विचार । असो पार्था ॥५१८॥
तुवां मजलागीं । पुसिल्या विभूति । ऐक तुजप्रति । सांगेन त्या ॥५१९॥
मग तो पार्थासी । म्हणे आत्माराम । विद्यांत * अध्यात्म–। विद्या ती मी ॥५२०॥
वक्त्यांचियाठायीं । वाद जो म्हणोन । विभूति ती जाण । माझी च गा ॥५२१॥
जेथें शास्त्राधारें । बोलती समस्त । परी एकमत । होत नाहीं ॥५२२॥
वादें वादें वाद । वाढत चि जाय । होईना निर्णय । कांहीं केल्या ॥५२३॥
ऐकतां जो वाद । श्रोतयांचा तर्क । स्वभावतां देख । जोर घेई ॥५२४॥
आणि प्रवक्त्यांचीं । [३] पांडित्य-प्रचुर । भाषणें मधुर । होती जेथें ॥५२५॥
ऐशापरी [४] प्रति–। पादनामाझारीं । पार्था, [५] अवधारीं । वाद तो मी ॥५२६॥
अक्षरामाझारीं । अकार [६] विशद । समासांत द्वंद्व । तो मी जाण ॥५२७॥

---

१ सगळीं. २ कारण; जरुरी. ३ विद्वत्तेनें भरलेलीं. ४ समजावून सांगण्यांत. ५ ऐक. ६ स्पष्ट.

मशकापासोनि । ब्रह्मदेवावेरीं । सर्व ग्रास करी । तो मी काळ ।।५२८।।
मेरु-मंदरादि । पर्वतांसहित । चुरोनि टाकीत । [१] मेदिनी जो ।।५२९।।
मग सकल हि । होतां जलमय । जिरवीत जाय । ठायीं च तें ।।५३०।।
कल्पांतींचें तेज । सर्वथा ग्रासून । टाकी जो गिळून । वायूतें हि ।।५३१।।
मग नभ:प्रांत । उरे तो समस्त । जयाच्या पोटांत । सामावे गा ।।५३२।।
ऐसा धनंजया । काळ जो अपार । तो मी, लक्ष्मी-धर । म्हणे ऐसें ।।५३३।।
मग सृष्टिकर्ता । जो का प्रजापति । अर्जुना, विभूति । माझी च ती ।।५३४।।

मृत्यु: सर्वहरश्चाहमुद्भवश्च भविष्यताम् ।
कीर्ति: श्रीर्वाक्च नारीणां स्मृतिर्मेधा धृति: क्षमा ।।३४।।

सृजिलीं जीं भूतें । तयांचें धारण । धनंजया जाण । मी च करीं ।।५३५।।
सकळां जीवन । मी च पंडुसुता । शेवटीं [२] संहर्ता । मृत्यु मी च ।।५३६।।
आतां स्त्रीगणांत । विभूति ज्या सात । कौतुकें त्या येथ । सांगेन मी ।।५३७।।
तरी ऐक जी का । नित्य नवी कीर्ति । माझी च ती मूर्ति । कुंति-सुता ।।५३८।।
आणिक औदार्या–। सहित संपत्ति । अर्जुना, विभूति । माझी च ती ।।५३९।।
बैसोनियां न्याय–। रूपी पालखींत । विवेकाचा पंथ । अंगीकारी ।।५४०।।
ऐसी जी का वाचा । ती माझी विभूति । म्हणे रमा-पति । भगवंत ।।५४१।।
देखिल्या पदार्थें । देतसे करोन । माझी आठवण । निरंतर ।।५४२।।
ऐसी जी का [३] स्मृति । ती माझी विभूति । तुज नको भ्रांति । येथें कांहीं ।।५४३।।
स्वहितानुकूल । बुद्धि इहलोकीं । [४] धृति मी त्रिलोकीं । क्षमा हि मी ।।५४४।।
ऐशापरी नारी–। माजीं सात शक्ति । त्या माझ्या विभूति । ओळख तूं ।।५४५।।
संसार-गजासी । जो का पंचानन । देव तो श्रीकृष्ण । ऐसें बोले ।।५४६।।

बृहत्साम तथा साम्नां गायत्री छन्दसामहम् ।
मासानां मार्गशीर्षोऽहमृतूनां कुसुमाकर: ।।३५।।

वेदांतील स्तोत्रां–। माजीं बृहत्साम । स्तोत्र जें उत्तम । जाण तें मी ।।५४७।।
अर्जुना * गायत्री–। छंद जो छंदांत । तो मी हें निभ्रांत । ओळख तूं ।।५४८।।

---

१ पृथ्वी. २ नाश करणारा. ३ स्मरणशक्ति. ४ धारणा; मनांत सांठवून ठेवण्याची शक्ति.

ऋतूंत वसंत । तो मी [१] पुष्पाकर । मासांत साचार । मार्गशीर्ष ॥५४९॥

द्यूतं छलयतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ।
जयोऽस्मि व्यवसायोऽस्मि सत्त्वं सत्त्ववतामहम् ॥३६॥

वृष्णीनां वासुदेवोऽस्मि पाण्डवानां धनंजयः ।
मुनीनामप्यहं व्यासः कवीनामुशना कविः ॥३७॥

स्पष्टपणें चोरी । चाले चव्हाट्यांत । परी नाहीं येत । निवाराया ॥५५०॥
छळितयांमाजीं । ऐसें जें का [२] द्यूत । विभूति निभ्रांत । माझी च ती ॥५५१॥
तेजस्वी वस्तूंत । जें का असे तेज । ती माझी सहज । विभूति गा ॥५५२॥
सर्व अंगीकृत । कार्यांमाजीं साच । विजय तो मी च । ऐसें जाण ॥५५३॥
व्यवसायांमाजीं । न्याय्य व्यवसाय । तो मी, देवराय । म्हणे ऐसें ॥५५४॥
सर्व सत्त्वगुण–। संपन्नांमाझारीं । जें का अवधारीं । सत्त्व तें मी ॥५५५॥
पार्था, यादवांत । ऐश्वर्यें भूषित । तो मी भगवंत । पाहें येथें ॥५५६॥
जो मी वसुदेव–। देवकी-नंदन । झालों अवतीर्ण । मथुरेंत ॥५५७॥
जन्मतां चि मज । नेवोनि गोकुळीं । यशोदेजवळी । ठेवूनियां ॥५५८॥
यशोदेची कन्या । योगमाया जाण । आणिली तेथोन । वसुदेवें ॥५५९॥
पार्था, स्तनपान–। निमित्तेंकरोन । शोषिले मीं प्राण । * पूतनेचे ॥५६०॥
जेणें बाळदशा । संपण्यापूर्वीं च । [३] अदानवी साच । सृष्टि केली ॥५६१॥
* महेंद्राचा गर्व । टाकिला झाडोन । करीं गोवर्धन । धरोनियां ॥५६२॥
* कालिंदीचें दुःख । निवारिलें जाण । करोनि मर्दन । कालियाचें ॥५६३॥
जेणें गोकुळाचें । केलें संरक्षण । [४] दावाग्निपासोन । धनंजया ॥५६४॥
करोनि उत्पन्न । दुजीं धेनु-वत्सें । लावियेलें [५] पिसें । * विरंचीस ॥५६५॥
बाळपणाचिया । उषःकालीं जेणें । अर्जुना, लीलेनें । एकाएकीं ॥५६६॥
कंसचाणूरादि । मोठमोठे दुष्ट । टाकिले गा नष्ट । करोनियां ॥५६७॥
सकळ हें पार्था । आहे तुज ठावें । म्हणोनि सांगावें । किती आतां ॥५६८॥
तरी यादवांत । तो मी भगवंत । जाण हें निश्चित । [६] सव्यसाची ॥५६९॥

---

१ फुलांची खाण. २ जुगार; फांशांनीं खेळणें. ३ दानव-दैत्य-रहित. ४ वणवा. ५ वेड. ६ अर्जुना.

आणि सोमवंशीं । पांडवांमाझारीं । तूं जो धनुर्धारी । तो हि मी च ॥५७०॥
म्हणोनियां तुज–। मज परस्पर । न पडे अंतर । प्रेम-भावीं ॥५७१॥
नेली तुवां माझी । *भगिनी चोरून । संन्यासी होऊन । लोकदृष्ट्या ॥५७२॥
तरी नाहीं आला । मन्मनीं विकल्प । तूं मी एकरूप । म्हणोनियां ॥५७३॥
मुनींमाजीं श्रेष्ठ । तो मी व्यासदेव । यादवांचा राव । म्हणे ऐसें ॥५७४॥
कवीश्वरांमाजीं । थोर कविवर्य । तो मी शुक्राचार्य । धैर्यवंत ॥५७५॥

दण्डो दमयतामस्मि नीतिरस्मि जिगीषताम् ।
मौनं चैवास्मि गुह्यानां ज्ञानं ज्ञानवतामहम् ॥३८॥

मुंगीपासोनि जें । ब्रह्मदेवावेरीं । नियमन करी । सर्वांचें हि ॥५७६॥
नियमित्यांमाजीं । ऐसें [१] अनिवार्य । [२] शासन तें होय । माझें रूप ॥५७७॥
धर्म-ज्ञानाचा जें । घेतसे कैवार । पार्था सारासार । निर्धारोनि ॥५७८॥
तें मी नीति-शास्त्र । शास्त्रांमाजीं सर्व । ऐसें बोले देव । यादवेंद्र ॥५७९॥
स्वभावें कौन्तेया । होती जे का मौनी । ब्रह्मा हि अज्ञानी । तयांपुढें ॥५८०॥
म्हणोनियां सर्व । गूढांमाजीं मौन । विभूति ती जाण । माझी च गा ॥५८१॥
ज्ञानियांच्या ठायीं । ज्ञान तें मी पाहीं । असो अंत नाहीं । विभूतींतें ॥५८२॥

यच्चापि सर्वभूतानां बीजं तदहमर्जुन
न तदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरम् ॥३९॥
नान्तोऽस्ति मम दिव्यानां विभूतीनां परंतप ।
एष तूद्देशत: प्रोक्तो विभूतेर्विस्तरो मया ॥४०॥

१८

मोजतां येतील । कैशा धनुर्धरा । पर्जन्याच्या धारा । सांगें मज ॥५८३॥
किंवा भूमीवरी । तृणांकुर होती । तयांची गणती । करवेल ? ॥५८४॥
महोदधीमाजीं । उठती तरंग । तयां [३] मिति सांग । असे काय ? ॥५८५॥
तैसे असंख्यात । विभूति-विशेष । म्हणे हृषीकेश । जाण माझे ॥५८६॥
परी मुख्य मुख्य । तुज [४] सात पांच । सांगितल्या साच । विभूति ह्या ॥५८७॥
गमे निरर्थक । वर्णन हें देख । विभूतींस [५] लेख । नाहीं माझ्या ॥५८८॥

---

१ अढळ. २ सत्ता; राज्यकारभार. ३ माप; संख्या. ४ थोड्याशा; (पंचाहत्तर). ५ गणना; मोजदाद.



D:\Dyaneshwari_2007\ADA10_247-276 ....273

म्हणोनि मी काय । सांगूं त्या विभूति । अर्जुना तूं किती । ऐकशील ? ।।५८९।।
ह्या चि लागीं आतां । एकवेळ तुज । सांगेन मी [1] निज–। वर्म ऐक ।।५९०।।
सर्व–। [2] भूतांकुरें । [3] विरूढे सहज । तें मी आदिबीज । हें चि जाण ।।५९१।।
नको मानूं उंच–। नीच थोर-सान । मी च एक मान । वस्तुजात ।।५९२।।
ह्या हि वरी आतां । सर्वसाधारण । ऐक एक खूण । आणिक हि ।।५९३।।
जेणें अनायासें । धनुर्धरा-येथें । माझ्या विभूतीतें । जाणशील ।।५९४।।

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ।।४१।।

ऐश्वर्य आणिक । दया हीं दोन्ही हि । आलीं जया ठायीं । रहावया ।।५९५।।
सर्वथा माझी च । विभूति ती होय । जाण नि:संशय । धनंजया ।।५९६।।

अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवार्जुन ।
विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ।।४२।।

इति श्रीमद्‌भगवद्‌गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे विभूतियोगो नाम दशमोऽध्याय: ।।१०।।

किंवा एकलें च । बिंब आकाशांत । परी त्रैलोक्यांत । तेज फांके ।।५९७।।
तैसी आज्ञा जया । एकाची च देख । पाळिती नि:शंक । सर्व लोक ।।५९८।।
एकला ऐसें तूं । तया नको म्हणूं । तया नको मानूं । धनहीन ।।५९९।।
काय सर्व वस्तु । आपुल्या सांगातें । घेवोनि हिंडते । काम-धेनु ? ।।६००।।
तियेपाशीं जो जो । जेव्हां जें जें मागे । तें तें देऊं लागे । एकसरां ।।६०१।।
तैसें विश्वांतील । सर्व हि ऐश्वर्य । [4] अंगभूत होय । तयाठायीं ।।६०२।।
तया जाणावया । ही च असे खूण । [5] तदाज्ञा-वंदन । करी लोक ।।६०३।।
ऐसे लोकमान्य । होती जे जे नर । जाण अवतार । माझे चि ते ।।६०४।।
भरोनि सर्वत्र । विश्वीं मी च एक । राहिलों नि:शंक । म्हणोनियां ।।६०५।।
ही तों साधारण । विभूति ही चांग । कल्पोनि विभाग । ऐशा रीती ।।६०६।।
विभूतींत मानी । सामान्य विशेष । तरी महा-दोष । लागे तया ।।६०७।।

---

१ स्वत:ची गुप्त खूण. २ प्राणिमात्ररूपी अंकुरानें. ३ रुजते. ४ मूळचेंच असलेलें. ५ त्याची आज्ञा.

भेदाचा कलंक । बुद्धीलागीं वायां । सांगें धनंजया । लावावा कां ? ।।६०८।।
रांधोनि अमृत । कां गा आटवावें । [1]घृत घुसळावें । कासयासी ? ।।६०९।।
वायुलागीं तरी । [2]सव्य-वाम अंग । असे काय सांग । सव्यसाची ।।६१०।।
रवि-बिंबा पाठ–। पोट पाहूं जातां । नासेल सर्वथा । निज-दृष्टि ।।६११।।
तैसी माझ्याठायीं । सामान्य विशेष । पार्था, ही [3]अशेष । भाषा लोपे ।।६१२।।
मज अपारातें । मोजशील किती । जाणोनि विभूति । भिन्न भिन्न ।।६१३।।
म्हणोनियां काय । बोलोनियां फार । विभूति-विचार । राहो आतां ।।६१४।।
माझिया एकांशें । व्यापिलें हें विश्व । तरी भेदभाव । सांडोनियां ।।६१५।।
सर्वत्र मी एक । सारिखा मानून । करीं गा भजन । ऐक्यभावें ।।६१६।।
ज्ञानीजन-रूपी । वनासी वसंत । असे जो एकान्त । विरक्तांचा ।।६१७।।
जो कां सर्व-गुण–। ऐश्वर्य-संपन्न । देव तो श्रीकृष्ण । बोले ऐसें ।।६१८।।
ऐकोनि ते बोल । पार्थ म्हणे स्वामी । सांगतां हें तुम्ही । काय आम्हां ? ।।६१९।।
सांडावया भेद । आम्ही तुम्हांहून । असों काय भिन्न । भगवंता ? ।।६२०।।
भेद तो निराळा । आम्ही हि निराळे । ऐसें तों उरलें । नाहीं आतां ।।६२१।।
अहो लोकांलागीं । म्हणे का भास्कर । लोक हो, अंधार । दूर सारा ।।६२२।।
परी कैसें म्हणूं । तुज अविचारी । मज काय तरी । शोभेल तें ? ।।६२३।।
मुखीं तुझें नाम । येतां एक वेळ । भेद तो राहील । कैसा कोठें ? ।।६२४।।
एक वेळ तुझें । नाम येतां कानीं । भेद तो पळोनि । जाय दूरी ।।६२५।।
ऐसा जो तूं ईश । पर-ब्रह्म पूर्ण । सुदैवें स्वाधीन । होसी आज ।।६२६।।
तरी आतां कोणें । कोठें कैसा देवा । भेद तो पहावा । सांगें मज ।।६२७।।
[4]उष्मा होय ऐसें । म्हणेल का कोणी । [5]गाभारां रिघोनि । चंद्राचिया ।।६२८।।
तुझें मज [6]साच । घडलें दर्शन । उरेल कोठून । भेद आतां ।।६२९।।
वरी थोर-पणें । सांगतसां मातें । सोडावें भेदातें । म्हणोनियां ! ।।६३०।।
करोनि श्रवण । पार्थाचें भाषण । स्वभावें श्रीकृष्ण । संतोषला ।।६३१।।
तया जीवेंभावें । आलिंगोनि मग । म्हणे नको राग । मानूं पार्था ।।६३२।।

---

१ तूप. २ उजवीडावी बाजू. ३ सगळीच. ४ उकाडा. ५ आंतील भागांत. ६ खरें.

भेदाचिया मार्गें । तुज पंडु-सुता । सांगितली कथा । विभूतींची ।।६३३।।
ती तुज अभेद–। भावें धनंजया । सर्वथा प्रत्यया । आली कीं ना ।।६३४।।
हें चि पहावया । आम्ही क्षणभरी । ऐसें [१] बाह्यात्कारीं । बोलिलों गा ।।६३५।।
तंव कळों आलें । तुझ्या चित्तीं [२] खासा । अभेदाचा ठसा । उमटला ।।६३६।।
विभूतींचें ज्ञान । तुज झालें चांग । ऐसें तो श्रीरंग । बोले तेव्हां ।।६३७।।
पार्थ म्हणे मज । विभूतींचें ज्ञान । झालें कीं ना जाण । तुझें तूं च ।।६३८।।
परी तूं चि एक । विश्वीं भरलासी । हें तों प्रत्ययासी । आलें माझ्या ।।६३९।।
पार्थालागीं ऐसा । आला जो प्रत्यय । सांगे तो संजय । धृतराष्ट्रा ।।६४०।।
परी धृतराष्ट्र । राहे उदासीन । पाहोनि हें खिन्न । संजय तो ।।६४१।।
म्हणे आलें भाग्य । दवडावें दूर । नव्हे का साचार । आश्चर्य हें ? ।।६४२।।
हें तों साच ह्यासी । बाह्य दृष्टि नाहीं । परी अंतरीं हि । आंधळा हा ।।६४३।।
असो, आतां देखा । कैसा तो अर्जुन । स्व-हिताचा मान । वाढवील ।।६४४।।
कैसी तयाचिया । चित्तामाजीं भली । उत्कंठा आगळी । उपजली ।।६४५।।
मनीं म्हणे सर्व । विश्व हरिमय । ऐसा जो प्रत्यय । अंतरींचा ।।६४६।।
तो चि ह्या दृष्टीसी । दिसो मूर्तिमंत । हें चि एक [३] आर्त । जीवालागीं ।।६४७।।
ह्या चि दोन्ही डोळां । पहावें सकळ । व्यापक वेल्हाळ । विश्वरूप ।।६४८।।
ऐसी उत्कटेच्छा । धरी तो साचार । भाग्य त्याचें थोर । म्हणोनियां ।।६४९।।
पार्थ वाटे शाखा । कल्पतरूची च । म्हणोनि नाहीं च । वांझ फुलें ।।६५०।।
देखा जें जें येई । तयाचिया मुखें । तें तें देव सुखें । साच करी ।।६५१।।
विषा हि सकट । आपण चि झाला । प्रल्हादाच्या बोला–। साठीं जो का ।।६५२।।
तो चि परमात्मा । देव आजि भला । सद्गुरू लाभला । पार्थालागीं ।।६५३।।
मग विश्वरूप । पुसावयासाठीं । कैसा तो किरीटी । [४] प्रवर्तेल ।।६५४।।
ऐकावी ती कथा । पुढें [५] श्रोतृ-जनें । ज्ञानदेव म्हणे । निवृत्तीचा ।।६५५।।

। इति श्री स्वामी स्वरूपानंदविरचित श्रीमत् अभंग-ज्ञानेश्वरी दशमोऽध्याय: ।

हरये नम: । हरये नम: । हरये नम: । श्रीकृष्णार्पणमस्तु ।

---

१ वरवर.  २. विशेष असा.  ३ तळमळ; उत्कट इच्छा.  ४ तयार होईल.  ५ श्रोत्यांनीं.